# प्रेस नोट ता. ०४/०३/२०२३    पोलीस स्टेशन - वाकड

## मोटार सायकल चोरास अटक एकुण १,८५,०००/- रुपये किंमतीच्या ०४ मोटार सायकली जप्त ०४ गुन्हे उघड

### वाकड पोलीस स्टेशन तपास पथकाची कामगिरी.

--- ०० ---

**मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त,पिंपरी चिंचवड यांनी मोटार सायकलचे गुन्हे उघड करणेबाबत आदेश दिले होते.** त्या अनुषंगाने मा.श्री.सत्यवान माने,वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाकड पोलीस ठाणे यांनी त्यांचे अधिनस्थ असलेल्या तपास पथकाकील सपोनि श्री. संतोष पाटील, पोउपनि.सचिन चव्हाण व तपास पथक अंमलदार यांना मोटार सायकलचे गुन्हे उघडे करणेबाबत सुचना दिल्या.

त्याप्रमाणे सपोनि. संतोष पाटील हे सोबतचे तपास पथकासह पेट्रोलींग करीत असताना **पोशि.स्वप्निल लोखंडे** यांना विश्वासु बातमी मिळाली की, एक इसम चोरीची मोटार सायकल विक्रीकरीता पाचपिर चौक, काळेवाडी पुणे येथे येणार आहे अशी बातमी मिळालेने, तात्काळ सदर ठिकाणी सापळा रचुन थांबलो असता तेथे एक इसम मोटार सायकलवर येवुन थांबला त्याची हालचाल संशयीत वाटल्याने त्यास पोलीस स्टाफचे मदतीने ताब्यात घेवुन नाव पत्ता विचारला असता त्याने स्वतःचे नाव दादासाहेब ऊर्फ अनिकेत बाळु निकाळजे वय २६ वर्षे रा.इंदीरानगर झोपडपट्टी, सुकटा, ता.भुम जि.उस्मानाबाद असे सांगीतले त्याचे ताब्यातील यामाहा एफझेड मोटार सायकल नं.एमएच.१४.एफझेड.७७०३ बाबत चौकशी केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली,त्यामुळे त्यास पोलीस स्टेशन येथे आणुन विश्वासात घेवुन चौकशी केली असता यामाहा एफझेड मोटार सायकल चोरी केली होती असे सांगीतले त्यामुळे वाकड पोलीस स्टेशनचे अभिलेख तपासले असता वाकड पोलीस स्टेशन गु.रजि.नं.९५/२०२३ भादविक ३७९ अन्वये दाखल असलेची माहीती मिळाली असलेने सदर गुन्हयात आरोपीस अटक करणेत आली आहे. आरोपीकडे झाले तपासात त्याने दाखल गुन्हयाव्यतिरीक्त आणखी दोन मोटार सायकल चोरी केलेचे कबुल केले असुन त्याचेकडुन मोटार सायकली जप्त करणेत आले आहेत.सदर आरोपीकडुन एकुण १,८५,०००/- रुपये किंमतीच्या ०४ मोटार सायकली जप्त करणेत आले असुन त्याबाबत खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

१) वाकड पोलीस स्टेशन गु.रजि.नं. ९५/२०२३ भादविक ३७९
२) वाकड पोलीस स्टेशन गु.रजि.नं. ८५७/२०२२ भादविक ३७९
३) वाकड पोलीस स्टेशन गु.रजि.नं. १९८/२०२३ भादविक ३७९
४) वाकड पोलीस स्टेशन गु.रजि.नं.१०९३/२०२२ भादविक ३७९

सदरची कारवाई मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.श्री.मनोज लोहीया सह पोलीस आयुक्त, मा. डॉ.संजय शिंदे सो, अपर पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा. श्री. डॉ.काकासाहेब डोळे सो, पोलीस उप आयुक्त,परि २, पिंपरी चिंचवड, मा. श्री. श्रीकांत डिसले, सहा.पोलीस आयुक्त सो, वाकड विभाग, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली मा.श्री.सत्यवान माने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मा.श्री. संतोष पाटील पोलीस निरीक्षक गुन्हे-१, मा.श्री.रामचंद्र घाडगे पोलीस निरीक्षक गुन्हे-२, सपोनि. संतोष पाटील, पोउपनि.सचिन चव्हाण, पोहवा.अतिश जाधव, पोना.प्रशांत गिलबीले, पोशि.स्वप्निल लोखंडे, पोशि.विनायक घार्गे,पोशि.कौतेंय खराडे, पोकॉ.अजय फल्ले, पोशि.तात्या शिंदे, पोशि.भास्कर भारती यांनी मिळुन केली आहे.

**(डॉ.काकासाहेब डोळे)**
पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ-२, पिंपरी चिंचवड